## निवडक

### नितीन सोनावणेंना पीएचडी पदवी प्रदान

**मुंबई** : मुंबईमध्ये कार्यरत असलेले वृत्तपत्र छायाचित्रकार नितीन वामन सोनावणे यांनी नुकतीच पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विषयातील पीएचडी ही पदवी संपादन केली. सत्यघटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे प्रभावी माध्यम आहे, असे त्यांच्या निदर्शनास आल्याने



त्यांनी संशोधनासाठी 'प्रकाशचित्रणातून दहा लोककलाकारांचे जीवनचरित्र' हा विषय निवडला. या विषयावर १७ वर्षांपासून काम केले. त्यांचा हा संपूर्ण ३८४ पानांचा प्रबंध (थिसीस) शोधगंगेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. आतापर्यंत लोककलेवर प्रकाशचित्रणाच्या माध्यमातून संशोधन झालेले नाही. लोककलेवर व तिच्या आविष्कारांवर काही संशोधकांनी संशोधने केली आहेत. ती सर्व लिखित स्वरुपातील आहेत. त्यातील काही संशोधकांचे प्रबंध नितीन यांनी अभ्यासले. या विषयात आणखीन भर घालण्यासाठी दृककला हे माध्यम महत्त्वाचे आहे. म्हणूनच नितीन यांनी प्रकाशचित्रांद्वारे हा विषय समाजापुढे घेऊन यायचे ठरवले. या विषयावरील प्रबंध सादर केल्यानंतर त्यांना टिळक महाराष्ट्र विद्यापिठातून पीएच.डी. ही पदवी प्रदान करण्यात आली.

### नेत्रतपासणी शिबिराला रावेत प्रतिसाद



**पेण** : तालुक्यातील रावे येथील जिजाऊ महिला ग्रामसंघ, ग्रामपंचायत रावे आणि आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २९) मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिर यशस्वी करण्यासाठी आशासेविका पुष्पलता पाटील यांच्यासह तृप्ती पाटील, हर्षलता पाटील, सारिका पाटील, स्नेहा पाटील, नम्रता पाटील, वेदिका पाटील, जागृती पाटील, योगिता पाटील, सोनाली पाटील, अपर्णा पाटील, रुपाली पाटील, आशा पाटील, अल्का पाटील, सोनाली पाटील, जयवंती पाटील, कांचन पाटील यांनी मेहनत घेतली.

### पनवेमध्ये पुस्तक प्रकाशन व गजल मुशायरा

**पनवेल :** नसिमा फाउंडेशन, गजल ग्रुप व पनवेल कोमसाप यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. ३१) पुस्तक प्रकाशन सोहळा आणि गजल मुशायरा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम ठाणा नाका रोडवरील ज्येष्ठ नागरिक सभागृहात सायंकाळी ४ वाजता होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षपद लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, मनपाचे सभागृह नेते परेश ठाकूर, फुग्रोचे व्यवस्थापकीय संचालक शंतनु मोईत्रा यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत, तर प्रमुख वक्ते म्हणून कवी, गजलकार दिवाकर वैशंपायन, सीकेटी महाविद्यालयातील प्रा. एम. एस. कांबळे, रोहिदास पोटे, मीनल वसमतकर, डॉ. मनीषा बनसोडे व डॉ. अविनाश पाटील लाभले आहेत. पुस्तक प्रकाशानंतर निमंत्रितांचा गजल मुशायरा होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर शेख व सतिष अहिरे करणार आहेत. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन नवीन पनवेल कोमसापचे अध्यक्ष गणेश कोळी, गजल ग्रुपचे डॉ. सुभाष कटकदौंड व नसिमा फाउंडेशनचे ॲड. सलिल शेख यांनी केले आहे.

# पुढचा नंबर हसन मुश्रीफांचा!

## भाजप नेते किरीट सोमय्यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

भ्रष्टाचाऱ्यांचे कर्दनकाळ भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आता आणखी एका मंत्र्याचा घोटाळा उघडकीस आणण्याचा इशारा दिला आहे. येत्या शुक्रवारी पुण्यात जाणार असून हसन मुश्रीफ यांच्यासंदर्भात हा दौरा असेल, असे त्यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले.

गेल्या काही महिन्यांपासून भाजप नेते किरीट सोमय्या महाविकास आघाडी सरकारमधील मंत्र्यांचे घोटाळे बाहेर काढत आहेत. नुकताच त्यांनी दापोली दौरा केला. परिवहनमंत्री आणि शिवसेना नेते अनिल परब यांचे रिसॉर्ट तोडण्यासाठी प्रतिकात्मक हातोडा घेऊन ते दापोलीत गेले होते. या दौऱ्यानंतर सोमय्यांच्या रडारवर कोण, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सध्या सुरू आहे. त्याचवेळी सोमय्या यांनी थेट हसन मुश्रीफ यांचे नाव घेतले आहे. पुढील दौरा एप्रिलमध्ये होणार आहे, पण तत्पूर्वी पुण्यात जाणार



आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान, शिवसेना नेते यशवंत जाधव यांच्या घरावर प्राप्तीकर विभागाच्या पथकाने छापा मारला होता. या छाप्यात अधिकाऱ्यांच्या हाती एक डायरी लागली. त्या डायरीत 'मातोश्री'ला दोन कोटी रुपयांची भेट आणि ५० लाख रुपयांचे घड्याळ दिल्याचा उल्लेख आहे. यावरून माफिया सेना स्वतःला वाचवण्यासाठी आता यशवंत जाधवांच्या आईचे नाव घेत आहेत, असे सोमय्या म्हणाले. जाधव आपल्या आईला ५० लाख रुपयांचे घड्याळ देणार का, अशी शंकाही त्यांनी उपस्थित केली.

### 'डर्टी डझन' जेल किंवा हॉस्पिटलमध्ये

महाविकास आघाडीचे सरकार पाच वर्षे चालेल, असे विधान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले होते. त्यावर भाजप नेते किरीट सोमय्या यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हे सरकार ५० वर्षे चालू दे, पण महाराष्ट्राच्या जनतेला लुटणारा माफिया ५० दिवसांत सरळ होणार, असा इशारा सोमय्यांनी दिला. आम्हाला जनतेची सेवा करायची आहे. आता कारवाया आणि न्यायालयीन आदेशाला गती आली आहे. पुढील ५० दिवसांत 'डर्टी डझन' एकतर जेल, बेल किंवा रुग्णालयात असतील. महाराष्ट्राला घोटाळामुक्त करणे हे आमचे लक्ष्य आहे. महाराष्ट्रात सरकार स्थापन करणे नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## हिंदू सणांच्या वेळीच नियम आठवतात का?

**मुंबई : प्रतिनिधी**

**भाजप नेते आशिष शेलार यांचा सवाल**

हिंदू सणांच्या परवानगीवरून भाजपचे नेते आशिष शेलार यांनी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार टीका केली आहे. हिंदू बांधवांचे सण साजरे करण्याबाबत परवानगी मागितली की, राज्य सरकारला नियम आठवतात का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

हिंदू नववर्षाच्या निमित्ताने गुढीपाडव्याला निघणाऱ्या शोभायात्रा आणि रामनवमीच्या मिरवणुकांना परवानगी द्या, अशी मागणी शेलार यांनी विधानसभेत केली होती. तेव्हापासून आजपर्यंत याबाबत सरकारकडून कोणत्याही स्पष्ट सूचना आल्या नाहीत. त्यामुळे मंगळवारी (दि. २९) बोलताना शेलार यांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. मुंबई पोलिसांनी मुंबईत १० मार्च ते ८ एप्रिलपर्यंत जमावबंदीचे आदेश दिले असून त्यासाठी आतंकवादी, देशविरोधी शक्ती या ड्रोन, रिमोट कंट्रोलचा वापर करून हल्ला करतील अशी माहिती पोलिसांकडे आल्याचे ते सांगत आहेत. अशी माहिती आली असेल तर त्याबाबत सुरक्षा यंत्रणांनी खबरदारी जरुर घ्यावी. हिंदू बांधवांच्या सण साजरे करण्यावर बंधने आणू नये, असे शेलार यांनी सांगितले.

## उरण देऊळवाडीतील वाचनालयात चोरी

**उरण : बातमीदार**

शहरातील देऊळवाडी येथे असलेल्या श्री गोपाळकृष्ण वाचनालयात सोमवारी रात्री चोरी झाली. चोरी झाल्याचे मंगळवारी (दि. २९) सकाळी वाचनालय कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले.

वाचनालयाच्या लेखनिक वृषाली पाठारे या मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे सकाळी ८:३० वाजता वाचनालय उघडण्यास इतर कर्मचाऱ्यांसह गेल्या होत्या. वाचनालयाला मुख्य दोन खोल्या आहेत. एका खोलीचे लॉक उघडल्यानंतर दुसऱ्या खोलीचे लॉक उघडण्यासाठी त्या गेल्या असता त्यांना त्या दाराचे कुलूप तुटल्याचे दिसले. त्यांनी आत डोकावून पाहिले असता एक कॉम्प्युटर, दोन कॉम्प्युटर स्क्रीन, रोख रक्कम १४ हजार ४०० रुपये, एक इंडक्शन



प्लेट व इतर सामान गायब झाल्याचे दिसले. कपाटाचे दारही उघडे होते. चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी त्वरित वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना कळविले.

कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष ॲड. पराग म्हात्रे, उपाध्यक्ष अरुण पाठारे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार आदी त्वरीत घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी उरण पोलिसांना याबाबत माहिती दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास गवते यांनी पाहणी करून पंचनामा केला. अज्ञात चोरट्याविरोधात उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुधागडातील सरसगड वणव्यात होरपळला

### सजीवसृष्टी, वनसंपदा झाली बेचिराख

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील ऐतिहासिक सरसगडावर सोमवारी (दि. २८) रात्री पुन्हा मोठा वणवा लागला. त्यात वनसंपदा व प्राणी, पक्षी बेचिराख झाले. उन्हाळ्याच्या दिवसात सर्वत्र लागणाऱ्या वणव्याने वनसंपदा उद्ध्वस्त होत आहे.

सरसगडावर सोमवारी रात्री लागलेला वणवा मोठ्या प्रमाणात भडकला होता. या वणव्यात मोठी वनसंपदा, जीवसृष्टी भस्मसात झाली. हा वणवा अधिक पसरला असता तर कदाचित मानवी वस्तीजवळ पोहचला असता.

भारतीय वन सर्वेक्षणाच्या (एफएसआय) अहवालानुसार देशात सर्वाधिक वणवे



(छाया : धम्मशील सावंत)

लागणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र पहिल्या दहामध्ये आहे. बहुतांश वणवे मानवनिर्मित आहेत. वणवे पेटवल्यामुळे पक्ष्यांची अंडी, पिल्लेही जळून जातात. त्यामुळे त्यांची संख्याही रोडावत चालली आहे.

वणव्यामुळे जंगलातील जैवविविधतेसह औषधी वनस्पती, रानमेवा, उपयोगी वृक्षांचेही अस्तित्वही धोक्यात आले आहे. यासंदर्भात परिसरातील नागरिकांनीही सतर्क राहून वनखात्याला सहकार्य करणे गरजेचे आहे, तसेच प्रशासनाने पुढाकार घेऊन वणवे लावणाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे, अशी मागणी हभप महेश पोंगडे महाराज यांनी केली आहे.

**वणवा नियंत्रणासाठी वनविभागाकडे फायर ब्लोअर्स उपलब्ध आहेत. वनविभागामार्फत सतत वणवे विझविण्याचे काम केले जाते. जिथे वणवा लागला असेल त्या विभागातील वनरक्षक, वनपाल किंवा वनक्षेत्र कार्यालयात संपर्क करावा, जेणेकरून आग लगेच आटोक्यात आणता येईल.**

**–रितेश नागोसे, वनक्षेत्रपाल, पाली, सुधागड**

## दिघोडे येथे ट्रेलरने घेतला पेट

**उरण : वार्ताहर**

दिघोडे येथे रानसई धरणाकडे जाणाऱ्या एका ट्रेलरने मंगळवारी (दि. २९) दुपारी अचानक पेट घेतला. जवळच असणाऱ्या एका यार्डमधील अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ धाव घेत ट्रेलरला लागलेली आग विझविली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दिघोडे येथील रानसई धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या आर्यन यार्डजवळ एमएच ४३ वाय १७५४ या ट्रेलरच्या मागील चाकांना अचानक आग लागली. ही आग उन्हामुळे तापलेला रस्ता व चाकांच्या घर्षणाने लागल्याचा अंदाज वर्तविला जात आहे.



महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,सा.बां.विभाग, पनवेल
पिनकोड-४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०
ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ९० (ई-निविदा) सन २०२१-२२ (फेर निविदा क्र.१)

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेलहे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप- या निविदे मध्ये एकूण ०३ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ३०.०३.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक ०८.०४.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :-

कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग, पनवेल

## हिंद टर्मिनल बंद करण्याच्या प्रशासनाच्या हालचाली

### ५०० कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील भेंडखळ गावाजवळ असणाऱ्या हिंद टर्मिनल कंपनी बंद करण्याचा घाट घातला जात आहे. त्यामुळे या कंपनीतील ५०२ कामगारांवर बेकारीचे संकट कोसळले आहे.

कंपनीची मशनरी बाहेर काढण्याचा प्रयत्न कंपनी व्यवस्थापनाने केला होता. मात्र संतप्त कामगारांनी जोपर्यंत कामगारांची देणी देण्याबाबत ठोस भूमिका जाहीर होत नाही तोपर्यंत एकही वस्तू कंपनीबाहेर जाणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे. भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत १५ वर्षांपूर्वी सेंट्रल वेअरहाऊस कॉर्पोरेशनच्या गोदामात हिंद टर्मिनल कंपनीने कंटेनर हाताळणीचे काम सुरू केले होते. येथे ५०२ स्थानिक कामगार काम करीत होते, मात्र सीडब्लसीसोबतचा १५ वर्षांचा करार संपल्यामुळे ३० एप्रिलपासून हिंद टर्मिनलचे काम बंद होणार आहे. त्यामुळे ५०२ कामगारांवर बेकारीचे संकट कोसळणार आहे.

**कामगारांची सर्व देणी ठेकेदार कंपन्यांकडे जमा करण्यात आली आहेत. भाडेवाढ आणि आमचा करार संपुष्टात आल्याने आम्ही हा निर्णय घेतला आहे.**

**–कॅ. विनित जोशी, वरिष्ठ अधिकारी, हिंद टर्मिनल**

## वलप ग्रामस्थांना घडविली तीर्थयात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वलप ग्रामपंचायत सदस्या ज्योत्स्ना राजेश पाटील यांच्यामार्फत तीर्थयात्रेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून सर्व धार्मिक कार्यक्रमांवर निर्बंध आले होते, परंतु गेल्या महिन्यापासून सर्व निर्बंध शिथिल करण्यात आले असल्याने मंदिरे खुली झाली आहेत. त्याअनुषंगाने या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबवणारे वलप गावातील राजेश पाटील यांच्या आयोजनातून तसेच वलप ग्रामपंचायतीच्या सदस्य ज्योत्स्ना पाटील व सदस्य नवनाथ खुटारकर यांच्यामार्फत तीर्थयात्रेचे २६ व २७ मार्चदरम्यान आयोजन करण्यात आले होते. यामध्ये त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, सप्तश्रृंगी माता, शिर्डी, शनि–शिंगणापूर, रेणुकामाता मंदिर, नेवासा यांसारख्या तीर्थक्षेत्रांचे दर्शन देण्यात आले.

या तीर्थयात्रेमध्ये वलप गावातील महिला मंडळ, ग्रामपंचायत सदस्यांनी सहभाग घेतला. यात्रेचे आयोजन केल्याबद्दल राजेश पाटील, जोत्स्ना पाटील व नवनाथ खुटारकर यांचे कौतुक होत आहे.



## पान १ वरून

### गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील सिडकोशी संबंधित जमिनींच्या समस्यांसंदर्भात बैठक

याच प्रश्नावर लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. सिडको गव्हाण विभागातील ज्या जमिनी येत्या काळात संपादित करणार आहेत त्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना १८ महिन्यांच्या कालावधीतच दिला पाहिजे, अशी प्रमुख मागणी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली. ग्रामस्थांच्या सर्व समस्यांबाबत लवकर बैठक घेण्यात येणार आहे.

## आदित्य बिर्ला ग्रुपकडून पनवेल महापालिकेस रुग्णवाहिका

**पनवेल : प्रतिनिधी**

आदित्य बिर्ला ग्रुपकडून महानगरपालिकेस मंगळवारी (दि. २९) बेसिक लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका कंपनीच्या सीएसआर फंडातून देण्यात आली. या रुग्णवाहिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे हस्तांतरण करण्यात आले.



या वेळी आदित्य बिर्ला सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कंपनी प्रा. लि. चे डॉ. शिरीष ठाकरे, गौतम अग्रवाल, एचआर हेड दिनेश घाडगे, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, राजेश डोंगरे उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातून पनवेल येथे उपचारासाठी मोठ्या प्रमाणात रूग्ण येत असतात. उपजिल्हा रूग्णालयातदेखील मोठ्या प्रमाणात रूग्णांची ये–जा सुरू असते. पनवेल महापालिका क्षेत्रातील आरोग्य सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून आयुक्त गणेश देशमुख विविध उपाययोजना राबवित आहेत. या रुग्णवाहिकेचा पालिका कार्यक्षेत्रातील रूग्णांसाठी मोठा उपयोग होणार आहे.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. ३० मार्च २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

कार्बेव्हॅक्स
- १२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१२ ते १४)

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.


# पनवेलमध्ये कोरोना रुग्णांची संख्या एक अंकी

## ■ चाचण्यांवर भर ■ आतापर्यंत १३ लाखांहून अधिक जणांचे लसीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील कोरोनाबाधितांची संख्या एक अंकी झाली आहे. निर्बंध शिथिल करून दैनंदिन व्यवहार सुरळीत झाले आहेत. असे असले तरी पुन्हा चौथ्या लाटेची शक्यता वर्तवण्यात आल्याने पालिका प्रशासनाकडून दैनंदिन चाचण्या व लसीकरणावर भर देण्यात येत आहे.

आतापर्यंत शहरात १२ लाख ६६ हजार ४०६ कोरोना चाचण्या करण्यात आल्या आहेत. तर एकूण १३ लख ३५ हजार ६३ नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. यामध्ये १२ ते १४ वयोगटातील एक हजार ७९६ बालकांनी पहिला डोस घेतला आहे.



पनवेलमध्ये पहिल्या व दुसऱ्या लाटेत मोठ्या संख्येने रुग्ण आढळले. मात्र त्यानंतर पालिका प्रशासनाने निदान, लवकर उपचार व लसीकरण ही कार्यप्रणाली स्वीकारली. रुग्णसंख्या कमी झाली तरी चाचण्या व लसीकरणावर भर कायम ठेवण्यात आला. यासाठी शहरातील चाचणी केंद्रांसह लसीकरण केंद्रांची संख्याही वाढवण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आता १२ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांचेही लसीकरण युद्धपातळीवर करण्यात येत आहे.

रुग्णसंख्या नियंत्रणात आल्यानंतर शहरात संपूर्ण निर्बंध हटवण्यात आले असून सर्व व्यवहार सुरळीत सुरू करण्यात आले आहेत. शहरात कोरोनाच्या दैनंदिन रुग्णांची संख्या एक अंकी आहे आणि यात गेले काही दिवस सातत्य आहे. असे असले तरी पालिका प्रशासन सतर्क आहे. यासाठी महापौर कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व नगरसेवक, नगरसेविका, आरोग्य विभाग सातत्याने मेहनत घेत आहे.



### चौथ्या लाटेच्या शक्यतेने प्रशासन सतर्क

चौथ्या लाटेच्या शक्यतेने पालिका प्रशासन सतर्क झाले आहे. पनवेल शहरात सोमवारपर्यंत (दि. २८) केवळ एका कोरोनाबाधिताची नोंद झाली आहे. आतापर्यंत ९२ हजार ५२७ कोरोनाबाधित रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. पनवेल महापालिकेने लसीकरणावर भर दिला असून आत्तापर्यंत एकूण १३ लाख ३५ हजार ६३ नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. १२ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये एक हजार ७९६ जणांनी पहिला डोस घेतला आहे.

## निवडक

### वीर वाजेकर महाविद्यालयात समुपदेशन

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी विशेष समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यत आले होते. या वेळी विद्यार्थिनींची रक्त तपासणी करून रक्त व हिमोग्लोबिन वाढीसाठी मोफत गोळ्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असणाऱ्या कम्युनिटी हेल्थ ऑफिसर डॉ. मोनाली चासकर यांनी विद्यार्थिनींना रक्त, हिमोग्लोबिन, लोह, कॅल्शियमयाचा आपल्या शरीरात असणारा उपयोग, त्याची आवश्यकता व त्याचे शरीरातील योग्य प्रमाण राखण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी विद्यार्थिनींसाठी महाविद्यालय पातळीवर आरोग्य सल्ला केंद्र स्थापन करण्याबाबत मनोगत व्यक्त केले. या वेळी प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आमोद ठक्कर, डॉ. राहुल पाटील, प्रा. पी. टी. भोये, डॉ.श्रेया पाटील, डॉ. आर. एस. जावळे, प्रा. संतोष देसाई, प्रा. दिक्षीता यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



### कामोठ्यात समूह गीत कार्यक्रम

**कामोठे :** अखंड भारत मंचच्या वतीने स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल गुढीपाडवा व नवीन वर्षारंभानिमित्त शनिवारी (दि. २ एप्रिल) देशभक्तीपर समूह गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कामोठे सेक्टर १६ येथील कराडी समाज हॉलमध्ये हा कार्यक्रम दुपारी १२ ते २ या वेळेत होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कामोठे येथील न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक सुरेश तुकाराम चाळके व मुख्य वक्ते सामाजिक कार्यकर्ते शामजी देसाई उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक अभिजित घोडके आहेत. समूह गीत कार्यक्रम बिहार, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, ओडिसा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड असा प्रांतनिहाय होणार आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### दिव्यांगांना शिष्यवृत्ती अर्जासाठी मुदतवाढ

**मुंबई :** शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीकरीता नवीन ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी दि. ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण समाधान इंगळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. त्याआधी विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर कारवाई

## ६१ चालकांकडून ५८ हजार रुपयांचा दंड वसूल

**नेरुळ : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरातील विविध कार्यालयात कामानिमित्त गेलेल्या विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर आरटीओकडून कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांनादेखील आर्थिक दंडाची झळ बसली. या कारवाईत एकूण ६१ जणांवर कारवाई केल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगीनी पाटील यांनी दिली.

राज्याचे परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे यांच्या आदेशाने व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर कारवाईचा बडगा उगारला. यावेळी ६१ केसेस दाखल करीत ५८ हजार ५०० इतका दंड वसूल केला आहे.



नवी मुंबई शहरातील मनपा मुख्यालय, सिडको, कोकणभवन, वाशी येथील टपाल कार्यालय व महावितरणच्या कार्यालयाबाहेर आरटीओचे कर्मचारी व अधिकाऱ्यांनी प्रवेशद्वाराचा ताबा घेत कारवाई केली.

या कारवाईत मोटारवाहन निरीक्षक प्रशांत शिंदे, राहुल गावडे, अविनाश मराठे व इतर कर्मचाऱ्यांनी भाग घेतला.

> **गेल्या काही वर्षांत झालेल्या अपघातांमध्ये ६० टक्के प्रमाण दुचाकीचालकांचे आहे. मृत्यूचे प्रमाणही जास्त आहे. म्हणून नवी मुंबईमधील सर्व सरकारी कार्यालयाबाहेरील कारवाई सातत्याने सुरू असणार आहे. विनाहेल्मेट दुचाकीचालकांवर कारवाई करण्यात येईल.**
>
> **– हेमांगिनी पाटील, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी**

# पिस्तूल विक्रीसाठी आलेले त्रिकूट ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे वसाहत परिसरात गावठी बनावटीची पिस्तूल व जीवंत काडतुसे विक्री करण्यासाठी आलेल्या तिघांना कामोठे पोलिसांनी रविवारी (दि. २७) रात्री ताब्यात घेतले. या तिघांपैकी एक जण हा अल्पवयीन आहे.

कामोठे वसाहतीमधील जवाहर इंडस्ट्रीयल परिसरात काही जण पिस्तूल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव यांना मिळताच, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक त्या परिसरात टेहाळणी करत होते. त्या वेळी एक संशयित रिक्षा जात असताना त्यांना दिसली. रिक्षा थांबवून रिक्षात बसेलले सराफुद्दीन आयुब शेख (वय २६), ऋषिकेश गायकवाड (वय २७) व १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा यांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता, सराफुद्दीन याच्याकडे देशी बनावटीची पिस्तूल तर ऋषिकेश यांच्याकडे ५ जीवंत काडतुसे आढळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. यातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलाची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे.

# उरण महाविद्यालयात व्यवसाय आणि वित्त मार्गदर्शन कार्यक्रम



**उरण : वार्ताहर**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात करिअर गाईडन्स विभागाच्या वतीने व्यवसाय मागदर्शन व वित्त मार्गदर्शन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

प्रा. के. ए. शामा कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. त्यांनी ऑनलाइन परीक्षेविषयी मार्गदर्शन केले आणि पदवीनंतर विविध कोर्सेस विद्यार्थ्यांनी केले पाहिजे व आपले कौशल्य विकसित करून रोजगार प्राप्त केला पाहिजे असे सांगितले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. पूर्वी पुजारी यांनी पदवीनंतर व्यवस्थापन, कौशल्य, विविध प्रमाणपत्र मिळवली पाहिजेत, तसेच संभाषण, व्यक्तिमत्व विकास घडवून करिअरच्या योग्य संधी मिळवल्या पाहिजे असे सांगितले. प्रा. कुलदिप भालेराव यांनी भारती विद्यापीठातील विविध आंतरराष्ट्रीय कोर्सेस याबद्दल मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मागदर्शनाखाली कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एच. के. जगताप यांनी केले. तर सूत्रसंचलन प्रा. डॉ. ए. आर.चव्हाण यांनी केले. आभार प्रा. डॉ. एम. जी. लोणे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# वीर वाजेकर महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर नेरे येथील कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन येथे २१ ते २७ मार्चदरम्यान उत्साहात झाले. शिबिराचे उद्घाटन उरण नगर परिषदचे प्रशासन अधिकारी अनिल जगधणी यांचे हस्ते झाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. जी. पवार हे यावेळी उपस्थित होते. सात दिवसीय शिबिरादरम्यान श्रमदान, बौद्धिक व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे कुष्ठरोग निवारण समितीचे चेअरमन प्रमोद ठाकूर, सचिव विनायक शिंदे, उपप्राचार्य डॉ. साहेबराव ओहोळ, आयक्यूएसी समन्वयक डॉ. आर. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. उत्तमराव घोरपडे, उपप्राचार्य डॉ. विलास महाले, माजी विद्यार्थी प्रवीण घासे, हरेश्वर ठाकूर, नीळकंठ कोळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सी. डी. धिंदळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. टी. गोतपागर यांनी तर आभार डॉ. आर. एस. जावळे यांनी मानले.



# पेट्रोल, डिझेलवरील व्हॅट कमी करून दिलासा द्यावा

## भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने पेट्रोल, डिझेलवरील व्हॅट कमी करून सामान्य जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांनी केली आहे.

नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हंटले आहे की, महाविकास आघाडी सरकारने अलिकडेच सीएनजीवरील व्हॅट १० टक्क्यांनी कमी केला आहे. मात्र हा निर्णय म्हणजे केवळ वरवरची मलमपट्टी आहे. गेली दीड वर्षे पेट्रोल, डिझेलवरील व्हॅट कमी करण्याची मागणी भारतीय जनता पक्ष करीत आहे. मात्र या सरकारने या मागणीकडे दुर्लक्ष केले.



केंद्र सरकारने ३ नोव्हेंबर २०२१ रोजी पेट्रोल, डिझेलवरील उत्पादन शुल्कात अनुक्रमे ५ व १० रुपयांची कपात केली. त्यापाठोपाठ भाजपची सत्ता असलेल्या राज्यांसह एकूण २५ राज्य सरकारांनी पेट्रोल, डिझेलवरील मूल्यवर्धित करात कपात करून जनतेला दिलासा दिला. मात्र महाराष्ट्राने पेट्रोल, डिझेलवरील व्हॅट अजूनही कमी केलेला नाही. पेट्रोल, डिझेल जीएसटीच्या कक्षेत आणण्यासही महाराष्ट्राने विरोध केला आहे. आता तरी आघाडी सरकारने पेट्रोल, डिझेलवरील व्हॅट कमी करावा आणि जनतेला दिलासा द्यावा, असे रामचंद्र घरत यांनी म्हंटले आहे.

# नेरूळमध्ये नशामुक्तीबाबत जनजागृती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याची ७५ वर्षे अर्थात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू असून त्या पार्श्वभूमीवर प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयच्या विद्यमाने बाईक रॅली काढून नशामुक्तीसाठी जनजागृती करण्यात आली. युवकांना व्यसनांपासून परावृत्त करण्याच्या हेतूने नशामुक्तीचा संदेश देत बाईक रॅलीचे आयोजन नेरुळमधील जगद्गुरू शंकराचार्य उद्यान येथे करण्यात आले.

व्यसनमुक्तीचा संदेश देत मुंबई राजभवन येथून ही रॅली रायगड जिल्ह्यामधील रोहापर्यंत गेली. या यात्रेदरम्यान, नेरुळ, सिवूड्स, जुईनगर, खारघर आणि कामोठे आदी ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पथनाट्य, मेडिटेशन, शांती संदेश देण्यात आला.

रॅलीतील युवकांचे विविध ठिकाणी स्वागत करण्यात आले. ईश्वरीय ज्ञानाने मनुष्याच्या जीवनात सुधारणा होणार आहे. त्यासाठी सर्व त्यांनी राजयोगचा अभ्यास केला पाहिजे, असे महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशच्या प्रभारी राजयोगिनी संतोष दीदी यांनी सांगत बाईक रॅलीला शुभेच्छा दिल्या. या वेळी डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या माजी डीन डॉ. सुरेखा पाटील यांनी विविध प्रकारच्या व्यसनांचे दुष्परिणाम वैज्ञानिक स्वरूपात कसे होतात याची माहिती दिली. भाजपचे नवी मुंबई मनपा माजी सभागृह नेते रविंद्र इथापे यांनी हिरवा झेंडा दाखवत ब्राह्मकुमारीजच्या युवकांनी काढलेली जनजागृती यात्रा प्रशंसनीय उपक्रम असल्याचे सांगितले.



# सावित्रीबाई फुले पुरस्काराने प्रतिष्ठित महिलांचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

महिला दिनाचे औचित्य साधून क्रियाशील प्रेसक्लब पनवेलतर्फे 'एक दिवस तिचा' हा कार्यक्रम आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडला. यानिमित्त सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांना सावित्रीबाई फुले २०२२ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, तर महिला पोलिसांना हळदीकुंकू व साडी देण्यात आली.

या वेळी परिमंडळ-२मधील महिला पोलिसांसोबत 'खेळ पैठणीचा सन्मान महिला पोलिसांचा' सिनेअभिनेता जयवंत भालेकर यांच्यासोबत रंगला. लावणीसम्राज्ञी माया जाधव यांनी ढोलकीच्या तालावर या गाण्यावर नृत्य केले आणि शाहीर शहाजी काळे यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.



कार्यक्रमात शकुंतला रामशेठ ठाकूर, रजनी म्हात्रे, प्रीती डाके, तृप्ती सांडभोर, वंदना गुळवे, सुवर्णा दखणे, रश्मी सोनावणे, स्मिता जाधव, ममता म्हात्रे, पद्मिनी पाटील, शुभांगी घरत, अस्मिता पाटील, कविता गायकवाड, कल्पना कोठारी, हरजिंदर कौर सिंग, गीतांजली भगत, भारती कडू यांना सावित्रीबाई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तसेच रायगड जिल्ह्यातील अवघ्या २५व्या वर्षी न्यायाधीश बनलेल्या रुची राजन भगत यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास भाजप युवा नेते हॅप्पी सिंग, उद्योजक नरसू पाटील, पत्रकार संजय कदम आदींसह महिलावर्ग उपस्थित होता.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. भारतातील सर्व विमान कंपन्यांकडे सध्या किती विमाने आहेत?**

*अ.)* १०१० *आ.)* ७१० *इ.)* ५१० *ई.)* ३१०

**२. रिझर्व बँक ऑफ इंडियाने अलीकडेचबंगळूर येथे रिझर्व बँक इनोवेशन हबची स्थापना कोणत्या उद्देश्याने केली आहे?**

*अ.)* डिजिटल व्यवहार वाढण्यासाठी *आ.)* बँकेतील गैरव्यवहार रोखण्यासाठी *इ.)* आर्थिक सेवा आणि उत्पादने गरीबांपर्यंत पोचण्यासाठी *ई.)* क्रेडीट कार्डचा वापर वाढण्यासाठी

**३. भारताचा हा शेजारी देश सध्या अतिशय गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे.**

*अ.)* बांगलादेश *आ.)* नेपाळ *इ.)* भूतान *ई.)* श्रीलंका




**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# झळा या लागल्या जीवा

कोरोनाच्या साथीमधून नुकताच सारा देश बाहेर पडत आहे. जीवनमान सुरळीत होऊ पाहात आहे. महाराष्ट्राने तर गेल्या दोन-अडीच वर्षांत खूप काही भोगले. साथरोगात पोळून निघाल्यानंतर निम्मा अधिक महाराष्ट्र आता दाहकतेच्या दुहेरी-तिहेरी लाटांमध्ये पोळून निघाला आहे. या दुहेरी-तिहेरी लाटा नैसर्गिक आहेत, तशाच त्या मानवनिर्मित आहेत. इतकेच नव्हे; तर त्यातील एखाददुसरी लाट शासननिर्मितदेखील आहे.

**पुढल्या चार दिवसांत राज्यात उष्णतेच्या लाटेचा धोका हवामान खात्याने वर्तवला आहे. तळपणाऱ्या सूर्यकिरणांमधून अतिनील किरणांचा माराही पृथ्वीवर होत असतो. ही अतिनील किरणे मानवी जीविताला धोकादायक असतात. पृथ्वीच्या वातावरणापलीकडे असलेला ओझोन वायूचा थर या अतिनील किरणांना बऱ्याच प्रमाणात रोखतो. तथापि, गेल्या काही दिवसांत सूर्याचा अतिनील निर्देशांक (युव्ही इंडेक्स) धोक्याच्या पातळीवर पोहचल्याचे शास्त्रज्ञांच्या दृष्टीस आले आहे. मार्च महिन्यात दुसऱ्यांदा महाराष्ट्रात उष्णतेची लाट आली. याआधी १७ ते १९ मार्च या काळात कोकण आणि विदर्भात ही लाट आली होती, तर आता महिनाअखेरपर्यंत वाढणाऱ्या या प्रचंड उन्हात विदर्भ आणि मराठवाड्यातील काही शहरे पोळून निघणार असे दिसते. सोमवारी विदर्भातील अकोल्यात सर्वोच्च तापमानाची नोंद झाली. पुढील काही दिवस उष्मा कायम राहणार असल्यामुळे दुपारच्या उन्हात बाहेर जाण्याचे टाळावे असा सल्ला हवामानतज्ज्ञांनी दिला आहे. वायव्येकडून वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे पश्चिम विदर्भ तापला असून येत्या काही दिवसांमध्ये राजस्थानातून वारे वाहू लागतील. त्यामुळे उष्णतेची लाट इतक्यात कमी होण्याची शक्यता नाही. अर्थात, उष्णतेचा हा दाह निसर्गनिर्मित असल्यामुळे त्याच्यापुढे माणसाचा निभाव लागणे कर्मकठीण. सोबतच महागाईच्या झळांचे काय करायचे असा दुसरा सवाल नागरिकांना भेडसावू लागला आहे. पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसचे दर गगनाला भिडले आहेत. युक्रेन आणि रशियामध्ये सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम महागाईच्या रूपाने आपण सारे भोगत आहोत. इंधनाचे दर आटोक्यात ठेवण्यासाठी केंद्र सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करीत असले तरीही त्या प्रयत्नांनाही मर्यादा आहेत. इंधनाचे दर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर अवलंबून असल्याने त्यात फार काही करता येण्यासारखे नाही. तरीही केंद्र सरकारनेच इंधनावरील अन्य कर कमी करून नागरिकांना थोडाफार दिलासा काही महिन्यांपूर्वीच दिला होता. गरज आहे ती राज्य सरकारांनी आपापल्या राज्यात कर कमी करण्याची. महाविकास आघाडी सरकारला मात्र इंधन करावर पाणी सोडण्याची अजिबात इच्छा नाही असे दिसते. केंद्र सरकारच्या विरोधात सायकल मोर्चे काढण्यापलीकडे सत्ताधाऱ्यांना काहीही करायची इच्छा नाही. उष्णता आणि महागाईच्या झळा सोसणाऱ्या महाराष्ट्राला वीजटंचाईलाही तोंड द्यावे लागत आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी पुकारलेल्या संपामुळे संपूर्ण महाराष्ट्र अंधारात जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. वीजनिर्मिती केंद्रांकडे अवघे दीड-दोन दिवस पुरेल इतकाच कोळशाचा साठा उरला आहे असे कळते. दुष्काळात तेरावा महिना या उक्तीचा प्रत्यय यावा अशी ही मानवनिर्मित संकटे आहेत. वीज कर्मचाऱ्यांच्या संपाबरोबरच बँक कर्मचाऱ्यांनीदेखील संपाचे हत्यार उपसल्याने एक लाख कोटी रुपयांचे धनादेश वटू शकलेले नाहीत. एसटीचे संपकरी कर्मचारी अजूनही आक्रमक पवित्र्यात आहेत. उन्हाळा, महागाई व सरकारी नाकर्तेपणा अशा या दाहक लाटांच्या माऱ्यामुळे महाराष्ट्र होरपळून निघत आहे.**



# माणसांपरिस माकडं बरी!

**खबरबात — नितीन देशमुख**

> **करोना होता त्या वेळी पर्यटक नसल्याने वानरे अभयारण्यातील महामार्गावर येत नव्हती. आता पुन्हा खायला मिळते म्हणून महामार्गाच्या कडेला, झाडावर किंवा पत्र्यावर माकडे बसतात. खायला दिल्यानंतर ही माकडे महामार्गावर येतात. आम्ही त्यासाठी फिरत असतो. कोण खायला देताना दिसल्यास दंड वसूल करतो. आठवड्याला दोन ते चार हजार रुपये दंड वसूल होतो.**
> **–विलास राठोड, वनरक्षक, कर्नाळा अभयारण्य**

जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारतात रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू होतात. भारतात दर तासाला ५३ अपघात होतात. दर चार मिनिटाला एकाचा मृत्यू होतो. सिग्नल क्रॉस करणे, ओव्हरटेक करणे, चुकीच्या दिशेने गाडी चालवणे, रस्त्यांची खराब स्थिती, वाहन चालक व पादचाऱ्यांची चूक अशा अनेक गोष्टी अपघातांसाठी कारणीभूत असल्याचे दिसून आले आहे.आपण अनेक वेळा रस्ता ओलांडण्यासाठी असलेल्या पादचारी पूलाचा वापर करीत नाही, त्यामुळे अपघात घडतात. मात्र कर्नाळा अभयारण्यातील माकडे एखाद्या शहाण्या माणसाप्रमाणे महामार्ग ओलांडताना त्यांच्यासाठी खास बनवलेल्या 'मंकी लॅडर' चा वापर करताना दिसतात. त्यामुळे म्हणावेसे वाटते की, 'माणसांपरिस माकडं बरी'

पनवेल तालुक्यातील कर्नाळा अभयारण्य जरी पक्ष्यांसाठी प्रसिद्ध असले तरीसुद्धा या अभयारण्यात वन्यप्राणी जीवन बघायला मिळते. रानडुक्कर, ससे, माकड, रानमांजर, भेकर, कोल्हा, मुंगूस, साळींदर आणि वानरांच्या काही जाती आणि क्वचित एखादा बिबट्या या अभयारण्यात हमखास आढळतो. या अभयारण्यातून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग जातो. महामार्गाच्या दुतर्फा वन खात्याने माकडे रस्त्यावर येऊ नयेत, यासाठी पत्र्याचे कंपाउंड केले आहे. माकडांना रस्ता ओलांडून पलीकडे जाण्यासाठी १० भुयारी मार्ग ठेवण्यात आले आहेत. याशिवाय मंकी लॅडर बनविण्यात आला आहे. त्याचा वापर करून अनेक वेळा माकडे महामार्गा ओलांडून जाताना दिसतात.

कर्नाळा अभयारण्यामधील महामार्गावरून अनेक पर्यटक जात-येत असतात. प्राण्यांना खायला देऊ नका, दंड आकाराला जाईल, असे फलक वन खात्याने या परिसरातील महामार्गावर लावले आहेत. मात्र त्याकडे दुर्लक्ष करून पर्यटक झाडावर किंवा कंपाउंडच्या पत्र्यावर बसलेल्या माकडांना केळी, वेफर्स व इतर पदार्थ खायला टाकतात. ते घेण्यासाठी रस्ता ओलांडून येताना वाहनाखाली येऊन महिन्याला तीन-चार माकडांचा मृत्यू होतो. त्यातुलनेत माणसांचे रस्ता ओलांडताना अपघाती मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त आहे. मात्र बहुतांशी माकडे रस्ता ओलांडण्यासाठी मंकी लॅडरचा वापर करतात.

### माकड बनले 'अंकल फॅटी'

*बँकॉक इथल्या फ्लोटिंग मार्केटमधील एक माकड 'अंकल फॅटी' म्हणून प्रसिद्ध आहे. पर्यटकांनी फेकलेले जंक फूड खाऊन खाऊन या माकडाचे पोट एवढे सुटले आहे की, त्याचे हिंडणे फिरणेही आता अवघड झाले आहे. या माकडाचे वजन त्याच्या मूळच्या वजनापेक्षाही दुप्पट वाढलंय. वजनामुळे त्याला नीट हिंडता फिरताही येत नाही. पण तिथल्या पर्यटकांना मात्र हे लठ्ठ माकड पाहून फारच गंम्मत वाटते. जनजागृतीसाठी याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. शेवटी इथल्या प्राणीप्रेमी संघटनांनी पुढाकार घेतला आहे आणि लवकरच या लठ्ठ माकडाला 'फॅट कॅम्प'मध्ये पाठवण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. तेथे उपचार करून त्यांचे वजन कमी करण्यात येईल.*



त्यांना पाहून दादा कोंडके यांच्या' एकटा जीव सदाशिव ' चित्रपटातील 'माणसांपरिस मेंढरं बरी' या गाण्यामध्ये बदल करून 'माणसांपरिस माकडं बरी' असं म्हणण्याची वेळ आली आहे. याशिवाय माकडांना केळी, वेफर्स व इतर पदार्थ खायला देऊन आपण मुक्या प्राण्यांच्या आरोग्याशी खेळतोय, याची कल्पनासुध्दा कोणीच करीत नाही. याबाबत आता प्राणीप्रेमी संघटनांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.



# उल्हास नदीला जलपर्णीचा विळखा

## सांडपाण्यासोबत वाहत असलेल्या शेवाळामुळे नेरळ परिसरातील पाण्यावर पसरली हिरवाई



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

बारमाही वाहणारी उल्हास नदी नेहमीप्रमाणे प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. शेवाळ आणि जलपर्णीमुळे प्रामुख्याने वाकस पुलापासून ठाणे जिल्हा हद्दीपर्यंतच्या नदीपात्रातील पाणी हिरवेगार दिसू लागले आहे.

खंडाळाच्या बोरघाटातून उगम पावणारी उल्हास नदी पुढे कर्जत तालुक्यातून वाहत जाऊन ठाणे जिल्ह्यात पोहचते. या नदीवर ठाणे जिल्ह्यातील काही शहरांच्या नळपाणी योजना आणि औद्योगिक वसाहत यांचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून नदीत वाहत येणाऱ्या सांडपाण्यामुळे उल्हास नदी प्रदूषित झाली आहे. त्यात नदीतील पाण्यावर जलपर्णी यांचा प्रभाव दिसून येत आहे. जानेवारी महिन्यापासून नदीच्या पात्रात जलपर्णी दिसून यायच्या. यावर कर्जत येथील उल्हास नदी निर्मल अभियान अंतर्गत गेली तीन वर्षे स्वच्छता मोहीम राबविली जात आहे. या स्वच्छता मोहिमेमुळे कर्जत येथून वाहून येणाऱ्या जलपर्णीची समस्या कमी झाली होती. पुढे नेरळपासून ठाणे जिल्हा हद्दीपर्यंत कृषिभूषण शेखर भडसावळे यांच्या सगुणा रुरल फाउंडेशनने उल्हास नदी जलपर्णी मुक्त करण्याचा नियोजनबद्ध कार्यक्रम राबविल्याने जलपर्णीचे प्रदूषण कमी झाले आहे. मात्र गेल्या आठवड्यापासून उल्हास नदीच्या पात्रातील पाणी हिरव्यागार थराने व्यापले आहे.त्यामुळे वाकस पुलापासून नेरळ दहिवली पूल आणि पुढे शेलूपर्यंत नदीच्या पात्रात स्वच्छ पाणी दिसून येत नाही. या वेळी जलपर्णीपेक्षा नदीमधील सांडपाण्यासोबत वहात येणाऱ्या शेवाळाने पाण्यावर हिरवा थर तयार झाला आहे. परिणामी नदीमध्ये अंघोळ करणाऱ्यांच्या अंगाला खाज येत असून नदीचे पाणीदेखील हिरवेगार झाले आहे.

> **नदीतील जलपर्णीचा सर्वांनी मिळून बंदोबस्त केला आहे. आता शेवाळही उल्हास नदीच्या प्रदूषणास कारणीभूत ठरत आहे. गटारातून वाहत येणारे सांडपाणी प्रक्रिया करूनच पुढे उल्हास नदीत सोडले पाहिजे आणि त्यासाठी सर्वांनी स्वत:हून बंधने घालून घेतली पाहिजेत.**
> **–शेखर भडसावळे, सगुणा रुरल फाउंडेशन, नेरळ**

कर्जत शहरात स्वच्छता मोहीम सुरू असली तरी शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी कोणतीही यंत्रणा नगरपालिकेकडे नाही. पुढे तालुक्यातील अन्य मोठ्या गावांतील सांडपाणी वाहून नेणारी गटारेदेखील उल्हास नदीच्या प्रदूषणातील मोठी समस्या बनली आहेत. यावर प्रशासनाने निर्बंध आणण्याची गरज आहे. असे मत तळवडे येथील कार्यकर्ते आत्माराम घोडविंदे यांनी व्यक्त केले आहे.

## आरोग्य प्रहर

### 'व्हिटामिन डी'चे महत्त्व

शरीरामध्ये व्हिटामिन डी असणे आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. व्हिटामिन डीची कमतरता जर आपल्या शरीरामध्ये झाली, तर अनेक प्रकारचे आजार आपल्याला होण्याची शक्यता असते. तसे होऊ नये यासाठी आपल्या शरीराला कधीही व्हिटामिन डीची कमतरता भासू देऊ नका. आपल्या शरीराला व्हिटामिन डी मुख्यत्वे सुर्यप्रकाशामुळे मिळते. यासाठी दररोज सकाळी साधारण ६.३० ते ८ पर्यंत उन्हाळात बसायला हवे. यामध्ये शरीराला आवश्यक असलेले व्हिटामिन डी मिळते. आपण आहारामध्ये काही गोष्टींचा समावेश करूनदेखील आपल्या शरीरातील व्हिटामिन डीची कमतरता पूर्ण करू शकतो. हे पदार्थ नेमके कोणते याबद्दल जाणून घेऊयात.

**संत्र्याचा ज्यूस–** शरीरामधील व्हिटामिन डीची कमतरता पूर्ण करण्यासाठी आपल्या आहारामध्ये संत्र्याच्या ज्यूसचा समावेश करा. यामुळे आपल्या शरीराला भरपूर प्रमाणात व्हिटामिन डीची नक्कीच मिळेल तसेच संत्र्याचा ज्यूस आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासही मदत करतो.

**गाजराचा रस–** आपल्या सर्वांनाच माहिती आहे की, गाजर आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. गाजराच्या मदतीने आपण आरोग्याच्या अनेक समस्या दूर करू शकतो. शरीरातील व्हिटामिन डीची कमतरता पूर्ण करण्यासाठी आपण गाजराच्या रसाचा आपल्या दररोजच्या आहारामध्येदेखील समावेश करू शकतो.

**गायीचे दूध–** गायीचे दूध केवळ व्हिटॅमिन डीचा चांगला स्त्रोत नाही, तर त्यात कॅल्शियमदेखील भरपूर असते. गायीच्या दूधामुळे हाडे मजबूत होण्यास मदत होते. गायीचे दूध प्यायल्याने त्वचा आणि केस निरोगी राहतात. जर तुम्हाला कच्चे दूध प्यायला आवडत नसेल, तर तुम्ही दूध स्मूदी बनवू शकता.

**दही किंवा ताक–** दही आणि ताक यामध्ये व्हिटॅमिन डी भरपूर प्रमाणात असते. लस्सी किंवा रायता याचादेखील आपण आपल्या आहारामध्ये समावेश करू शकतो. दही आणि ताक यातून आपल्या शरीरातील जीवनसत्त्वांची कमतरता पूर्ण होते. उन्हाळ्यात दही शरीराला थंड ठेवते. यामुळे अनेक आजार टाळता येतात. दह्याचा आहारात समावेश करा.

**सोयाबीन दुध–** सोया मिल्कमध्ये व्हिटॅमिन डी मुबलक प्रमाणात असते. त्यात कॅल्शियम आणि लोहदेखील भरपूर आहे. हे पेय हाडे मजबूत करण्यास मदत करते. शाकाहारींसाठी हा एक चांगला पर्याय आहे. आपल्या दररोजच्या आहारामध्ये सोयाबीनच्या दुधाचा नक्की समावेश करा.







# नेरळमध्ये कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**कर्जत : बातमीदार**

नेरळ मोहचीवाडी येथील रणरागिणी महिला मंडळाच्या वतीने कर्जत तालुक्यातील चार कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी भाजप महिला मोर्चा जिल्हा अध्यक्षा अश्विनी पाटील तसेच कर्जतच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी रणरागिणी महिला मंडळाच्या कार्याचा गौरव केला.

रणरागिणी महिला मंडळाने नेरळ येथील शनी मंदिर सभागृहात कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. त्यात शेलू येथील युवा पॉवरलिफ्टर अमृता भगत, आरोग्य क्षेत्रातील मनिषा खराटे, प्राथमिक शिक्षिका मनिषा चोणकर आणि पत्रकार ज्योती जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, जिल्हा उपाध्यक्ष बिनिता घुमरे, जिल्हा सरचिटणीस मृणाल खेडकर, माजी तालुका अध्यक्षा सुगंधा भोसले, कर्जतच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, मंडळाच्या अध्यक्षा वर्षा बोराडे, सरस्वती चौधरी, विद्या विकास शाळेच्या मुख्याध्यापिका विनया काकडे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# न्यायालयाने स्थगिती आदेश देऊनही बांधकाम सुरू कसे?

## रेवदंडा येथील 'त्या' बांधकामावर विलास बुरांडे यांची कारवाईची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

एकीकडे सीआरझेड प्रकरण तर दुसरीकडे न्यायालयाने दिलेला स्थगिती आदेश या दोन्हीला न जुमानता अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथे सुरू असलेल्या 'त्या' बांधकामावर संबंधित यंत्रणेने तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी विलास बुरांडे यांनी रविवारी (दि. २७) पत्रकार परिषदेत माहिती देताना केली.

अलिबाग-आक्षी येथील विलास गजानन बुरांडे यांची रेवदंडा येथे जमीन मिळकत आहे. सर्व्हे नंबर २२८, हिस्सा ७ मध्ये क्षेत्रफळ ०-३६-० पैकी १०.१ ही मिळकत त्यांनी २००० मध्ये खरेदी केली. त्या मिळकती मध्ये जाण्याचा मार्ग उर्वरित जागेतून जाण्यासाठी मान्य करण्यात आला होता. बुरांडे यांनी आपल्या मिळकतीत जवाहर योजनेतून विहीर बांधली, नारळ लावले परंतु २००७ पासून या मिळकतीवरून वाद सुरू झाले. त्यांना त्यांच्या मिळकतीमध्ये जाण्याचा रस्ताच अडविण्यात आला. २००७ पासून ही मिळकत वादग्रस्त झाली. दोन वेळा दिवाणी दावे झाले. २००७ मधील दोन दाव्यात विलास बुरांडे यांच्या बाजूने निकाल लागला तर तर २०१४ आणि १६ मधील अपील विरोधात मंजूर झाले. २८ फेब्रुवारी २०२२ मध्ये विलास बुरांडे यांनी त्या वादग्रस्त जागेवर कोणत्याही प्रकारे बांधकाम होऊ नये म्हणून स्थगिती आदेश देण्याची न्यायालयाकडे मागणी केली आणि ती मान्य झाली. न्यायालयाने ९० दिवसाचा स्थगिती आदेश दिला अशी माहिती विलास बुरांडे यांनी पत्रकारांना दिली.

वादग्रस्त मिळकतीवर एकीकडे सीआरझेड कायद्याच्या उल्लंघन प्रकरणी कारवाई झाली आहे आणि आता न्यायालयानेदेखील ९० दिवसाचा स्थगिती आदेश दिला आहे, तरीही तेथे बांधकाम सुरू आहे. या बाबत संबंधित महसूल यंत्रणा कोणतीच कारवाई करीत नसल्याचे विलास बुरांडे यांनी सांगितले. न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशाबाबत संबंधित यंत्रणेला लेखी स्वरूपात माहिती दिल्याचे सांगून श्री बुरांडे यांनी सीआरझेड आणि न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणाऱ्या विरोधात महसूल विभागाने कारवाई करावी अशी मागणी पत्रकार परिषदेत बोलताना केली.

# महाड आगाराच्या नव्या इमारतीचे काम रखडले

(छाया : महेश शिंदे)



■ मुंबई–गोवा महामार्गावरून महाड बसस्थानकात येण्यासाठी एसटीचा रस्ता आहे. हाच रस्ता महाड शहरातील नागरिक व वाहन चालक शहरात प्रवेश करण्यासाठी वापरत असतात. ज्या ठिकाणी एसटीची नवीन इमारत होत आहे, तेथील रस्त्याचा भाग इमारत रेषेत येत असल्याने हा रस्ता एसटीने बंद केला आहे व त्याऐवजी शेजारून खडीचा कच्चा रस्ता इतर वाहन चालकांसाठी तयार करून दिला आहे. या कच्च्या रस्त्यावरून वाहन चालकांना तसेच महाडमधील नागरिकांना प्रवास करावा लागत आहे.

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावरील महाड एसटी आगार व बसस्थानकाच्या इमारतीचे बांधकाम निधीचा अभावी आणि ठेकेदाराने केलेल्या कामाचे थकीत बिल यामुळे गेल्या वर्षापासून ठप्प झाले आहे. यामुळे प्रवासी व कर्मचाऱ्यांना जुन्या धोकादायक इमारतीत वावरावे लागत आहे.

महाड बसस्थानक व आगाराची इमारत ५० वर्षे जुनी आहे. बसस्थानकाच्या इमारतींमध्ये असणारे उपहार गृह, बुक स्टॉल, स्नॅक्स दुकाने, आरक्षण कक्ष, कर्मचारी कक्ष तसेच चालक व वाहक यांच्यासाठी असलेले विश्रामगृह याच जुन्या इमारतीमध्ये आहेत. मात्र ही इमारत आता जुनी झाल्याने धोकादायक बनली आहे.

मुंबई–गोवा महामार्गावरील महाड आगार व बसस्थानक हे मध्यवर्ती ठिकाण आहे. या स्थानकातून दररोज शेकडो गाड्यांची ये–जा होत असते. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, पुणे तसेच विविध ठिकाणी जाणाऱ्या बसेस या ठिकाणी थांबत असतात. तसेच महाड आगारात गाड्यांची दुरुस्ती, इंधन भरणे कामदेखील होत असते, मात्र ही इमारत धोकादायक झाल्याने प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या इमारतीचे बांधकाम नव्याने करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर तीन वर्षापुर्वी फडणवीस सरकारच्या काळात तिच्या बांधकामाला मान्यता मिळाली. यानंतर महाड बस स्थानकाच्या जवळील मोकळ्या जागेत बांधकाम सुरू झाले असले तरी सरकार बदलताच अल्पावधीतच हे काम ठप्प झाले आहे.

या इमारतीचे बांधकाम ठप्प झाल्यामुळे जुन्या धोकादायक इमारतीमध्ये प्रवासी, नागरिक तसेच येथील दुकानदारांना आसरा घ्यावा लागत आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी चार कोटी ४७ लाख रुपये अंदाजित खर्च असून चांगल्या दर्जाचे बसस्थानक व आगाराची इमारत या ठिकाणी होणार आहे. परंतु ठेकेदाराला उर्वरित रक्कम व त्याने केलेल्या कामाची रक्कम मिळत नसल्याने काम ठप्प झाले आहे. याठिकाणी सुमारे एक कोटीहून अधिक रकमेचे काम झाले असले तरी कामासाठी निधी वर्ग न झाल्याने महाड बस स्थानक व आगाराचे काम ठप्प झाले आहे.

राज्य परिवहन मंडळाच्या वरिष्ठ कार्यालयातून यासाठी निधी मंजूर केला जात असतो. ठाकरे सरकारची विकासकामांची स्थगिती आणि लॉकडाऊनमुळे एसटी महामंडळाला बसलेला फटका पाहता महाड आगाराच्या इमारतीला निधी कधी वर्ग होणार हा प्रश्न निर्माण झाला आहे.

> **निधी नसल्याने महाड एसटी आगाराच्या इमारतीचे काम सध्या थांबलेले आहे. ठेकेदाराने केलेल्या कामाचे बिल सादर केले आहे. कोरोना आणि त्यानंतर वाढलेले दर यामुळे पुन्हा वाढीव दराची मागणी झाली आहे, निधी वर्ग होताच काम पुन्हा सुरू केले जाईल.**
> **–रोहिदास कांबळे, उपअभियंता एसटी अभियांत्रिकी विभाग**

महाडमध्ये सुमारे सहा कोटी रुपये खर्चून नवीन इमारत बांधण्यात येणार आहे. तत्कालीन खासदार अनंत गीते, पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते ७ मार्च २०१९ रोजी या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. पुर्णावस्थेकडे चाललेल्या इमारतीचे काम सद्या निधी अभावी ठप्प आहे. महाड आगाराकडे एकरमध्ये जमीन उपलब्ध आहे.

महामार्गाला लागूनच असलेली जमीन मोकळी असून मधील भागात आगाराची आणि स्थानकाची जुनी इमारत, तर मागील बाजूस कार्यालय आणि मेकॅनिकॅल यंत्रणा आहे. ज्या ठिकाणी जुनी इमारत आहे, त्या जागेत इमारतीचे बांधकाम न करताच मधोमध इमारत बांधून जुनी इमारत तशीच ठेवण्यात आली आहे.

दगडी कामातील जुनी इमारत आजही शाबूत आहे. हीच इमारत दुरुस्त झाली असती तर कोट्यवधी रुपये वाचले असते, असेही सांगितले जात आहे.

# रायगडातील धरण क्षेत्रांत मुबलक पाणीसाठा

## पाभरे धरणात सर्वाधिक, तर साळोखे धरणात सर्वांत कमी पाणी

**रोहे : महादेव सरसंबे**

रायगडात २०२१ मध्ये समाधानकारक पाऊस पडल्याने जिल्ह्यातील धरणे तुडुंब भरली होती. पाऊस उशिरापर्यंत राहिल्याने या वर्षी धरण क्षेत्रातील पाणी पातळी कायम राहिली. त्यामुळे मार्च अखेरीस रायगड जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या धरण क्षेत्रांत समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. पावसाळा सुरू होण्यास अजूनही अडीच महिने शिल्लक आहेत.

पाटबंधारे विभागाच्या रायगड जिल्ह्यातील २८ पैकी २१ धरणांत ५० टक्क्यांपेक्षा जास्त तर सात धरणांत ५० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा उपलब्ध आहे. पाभरे (ता. म्हसळा) धरणात सर्वाधिक ८८ टक्के तर साळोख (ता. कर्जत) धरणात सर्वात कमी २८ टक्के पाणीसाठा आहे.

### रायगडातील धरणांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा

| धरण | तालुका | पाणीसाठा | धरण | तालुका | पाणीसाठा |
|---|---|---|---|---|---|
| फणसाड | मुरुड | ४९ टक्के | संदेरी | म्हसळा | ८६ टक्के |
| वावा | तळा | ७८ टक्के | वरंद | महाड | ५१ टक्के |
| सुतारवाडी | रोहा | ७८ टक्के | खिंडवाडी | महाड | ८० टक्के |
| आंबेघर | पेण | ६८ टक्के | कोथुर्डे | महाड | ४१ टक्के |
| श्रीगाव | अलिबाग | ४४ टक्के | खैरे | महाड | ६० टक्के |
| कोंडगाव | सुधागड | ७७ टक्के | साळोख | कर्जत | २८ टक्के |
| घोटवडे | सुधागड | ५७ टक्के | अवसरे | कर्जत | ५० टक्के |
| ढोकशेत | सुधागड | ५९ टक्के | भिलवले | खालापूर | ५४ टक्के |
| कवेळे | सुधागड | ५६ टक्के | कलोते मोकाशी | खालापूर | ७० टक्के |
| उन्हेरे | सुधागड | ७२ टक्के | डोणवत | खालापूर | ४६ टक्के |
| कार्ले | श्रीवर्धन | ७८ टक्के | मोरबे | पनवेल | ३८ टक्के |
| कुडकी | श्रीवर्धन | ८० टक्के | बामणोली | पनवेल | ५१ टक्के |
| रानीवली | श्रीवर्धन | ७२ टक्के | उसरण | पनवेल | ६७ टक्के |
| पाभरे | म्हसळा | ८८ टक्के | पुनाडे | उरण | ४९ टक्के |



# उपोषणकर्त्या अधिपरिचारिकांची प्रकृती बिघडली

## अलिबागेत नवव्या दिवशीही उपोषण सुरूच



**अलिबाग : प्रतिनिधी**

आपल्या मागण्यांसाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसलेल्या अधिपरीचारिकांची प्रकृती बिघडू लागली आहे. उपोषणाचा मंगळवारी (दि २९) नववा दिवस होता. प्रकृती बिघडत असली तरी मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार अधिपरिचरिकांनी केला आहे.

अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात तीन वर्षाचे प्रशिक्षण पुर्ण करून उत्तीर्ण झालेल्या अधिपरिचारीकांनी १८ महिन्यांसाठी शासकीय नियुक्ती मिळावी याकरीता २१ मार्चपासून समाज क्रांती आघाडीचे जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण सुरु केले आहे. या नऊ दिवसांमध्ये आंदोलन स्थगित करण्याचे पत्र जिल्हा शल्यचिकित्सकांकडून अनेक वेळा दिले जात आहे.

अधिपरिचारीकांच्या या आंदोलनाला आतापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रातील तीनशेपेक्षा अधिक मंडळींकडून पाठिंबा दर्शविण्यात आला आहे. गेल्या नऊ दिवसांपासून सुरु असलेल्या आमरण उपोषणामुळे शनिवारी बी. जी. पाटील, भाग्यश्री पाटील, शिवाजी जाधव, प्रणाली भोसले, सिध्देश्वर गायकवाड या उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचे आवाहनही करण्यात आले. परंतु जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत येथून हलणार नाही, अशी ठाम भुमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे.

> **अधिपरिचारिकांना शासकिय नियुक्ती आदेश मिळावा यासाठी आमरण उपोषण सुरु केले आहे. हे उपोषण मोडीत काढण्यासाठी आरोग्य सचिवांकडून परिचारिका नोंदणी रद्द केली जाईल, अशी धमकी पत्राद्वारे दिली जात आहे. गेल्या नऊ दिवसांपासून उपोषण सुरु आहे. मात्र आरोग्य सचिव याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत.**
> **–बी. जी. पाटील, अध्यक्ष, रायगड जिल्हा समाज क्रांती आघाडी**

(छाया : संतोष पेरणे)



# घरकुलाच्या मागणीसाठी लाभार्थ्याचे ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर आमरण उपोषण

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील साळोख तर्फे वरेडी ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या घरकुलाचा लाभ मिळावा या मागणीसाठी माले गावातील मारुती अनंत भुंडेरे यांनी आपल्या कुटुंबासह ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर आमरण उपोषण सुरु केले आहे. या उपोषणाला ग्रामस्थांनी पाठिंबा दिला आहे.

साळोख तर्फे वरेडी ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील माले या गावातील मारुती भुंडेरे यांना १५ व्या वित्त आयोगामधून १५ मे २०२१ रोजी घरकूल मंजूर झाले आहे. हे घरकूल उभारणीचा कार्यारंभ आदेश २८ जून २०२१ रोजी ठेकेदार निखिल सदाशिव बडेकर यांना दिले असल्याचे ग्रामपंचायतीने २८ फेब्रुवारी २०२२ रोजी मारुती भुंडेरे यांना पत्राद्वारे कळविले होते, मात्र सदरचे काम अद्याप सुरू झालेले नाही.

दरम्यान, भुंडेरे यांचे सध्याचे राहते घर मोडकळीस आले असून, ते कोणत्याही क्षणी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे १५ व्या वित्त आयोगामधून मंजूर झालेल्या घरकुलासाठी मारुती भुंडेरे यांनी आपल्या कुटुंबासह आमरण उपोषण सुरु केले आहे. साळोख तर्फे वरेडी ग्रामपंचायत सदस्य यतिश शिवराम आगीवले यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन उपोषणाला पाठिंबा दिला आहे. या कुटुंबाला न्याय्य मिळेपर्यंत आपण उपोषणस्थळी उपस्थित राहणार असल्याचे यतिश आगिवले यांनी जाहीर केले आहे. या आमरण उपोषणाला ग्रामस्थांनीही पाठिंबा दिला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. अनिल बाळकृष्ण गोवारी** रा. घर नं. १२३३३, मच्छी मार्केटजवळ, कोळीवाडा, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णन :**

**मौजे–वाजापूर, ता. पनवेल, जि. रायगड.**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २ | १ | १–००–००<br>वरकस ०–१६–६०<br>पो.ख. ०–०५–८०<br>एकूण– १–२२–४०<br>पैकी– ०–२१–०० | ११.८७<br><br><br><br>२.१४ |

**०–२१–०० (हे.आर.पॉ.) क्षेत्राबाबत**

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक : २९/०३/२०२२**

**सही/–**
**आकाश उ. डोंगरे**
**ॲडव्होकेट**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो.नं. ८१०८५५८२८९**

पत्ता :– शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.



**पनवेल महानगरपालिका**
**मालमत्ता कर विभाग**

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२२/प्र.क्र.१००/१३०/२०२२ दिनांक :– २९/०३/२०२२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,चे प्रकरण ११ व कराधान नियम ८, अन्वये ५ दि. ०१ ऑक्टोबर २०१६ पासून ते सन २०२०–२१ या वर्षाकरिता सुधारित कर आकारणीची अंतिम यादी जाहीर प्रसिद्धीबाबत सूचना नोटीस.

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय ‘अ’ वाढीव हद्दीतील तळोजा औद्योगिक क्षेत्र क्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की,

आपल्या भोगवट्यातील इमारतीची व भूखंडाचे तपासणी व करमुल्यांकन करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम क्र.१२७,१२८अ,१२९,१२९अ,१३१,१३२ व प्रकरण ८ कराधान नियम ८ ते १९ अन्वये पनवेल महानगरपालिका वाढीव हद्दीतील तळोजा औद्योगिक क्षेत्र क्षेत्रातील सर्व मालमत्तांना पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दि. ०१ ऑक्टोबर २०१६ पासून ते सन २०२०–२१ या पाच वर्षाकरिता इमारतीचे व भूखंडाचे कर निर्धारणाकरिता लागू करण्यात आलेल्या अंतिम करमुल्यांकन याद्यांची प्रसिद्धी दि. २८/०३/२०२२ रोजी करण्यात येत आहे.

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय ‘अ’ वाढीव हद्दीतील तळोजा औद्योगिक क्षेत्र क्षेत्रातील संपूर्ण मालमत्तांची (इमारती व खुले भूखंड) मालकी असलेल्या मालमत्ताधारकांना/भोगवटाधारकांना जाहीर प्रसिद्ध केलेली अंतिम करमुल्यांकन यादी प्रभाग समिती (‘अ’) कार्यालय स्थळ :– प्रभाग समिती (‘अ’) उपविभाग कार्यालय नावडे, नावडे गाव कमानीजवळ जुने नावडे ग्रामपंचायत कार्यालय या कार्यालयात पाहणीकरिता कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळता पाहणीकरीता उपलब्ध आहेत.

तसेच सुधारित चालू मागणी व मूळ ग्रामपंचायत नोंदणी मालमत्तांची सन २०२०–२१ पर्यंत वसुली व थकबाकी यांचे समायोजन करुन अशा मालमत्ताधारकांना सन २०२१–२२ करिता सुधारीत देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, चे प्रकरण ८ नियम ३०,३९ व ४० व प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम क्र. १२९अ अन्वये देयके यानंतर बजावण्यात येईल.

**संपर्क अधिकारी :**
१) सुनील मानकामे (सहा–आयुक्त – मालमत्ता कर विभाग)
भ्रमणध्वनी क्र. :– १८००–५३२०–३४०
फोन नं. ०२२–२७४५८०४०/४१/४२
ई–मेल – pmc.tax2016@gmail.com

**सही/–**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना.**

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा ४६४ | पाचंनद ११ | २६३/१ | ०–२३–० | २०० चौ.मी. | भुखंड क्र. २२, सेक्टर–१७, क्षेत्र २०० चौ.मी. | **कै. महमद इब्राहिम अलीसाहेब पटेल उर्फ पाटील (मयत) यांचे वारस**<br>१) अब्दुल रेहमान मोहमद इब्राहिम पटेल<br>२) अब्दुल लतिफ मोहमद इब्राहिम पटेल<br>३) अब्दुल गणी मोहमद इब्राहिम पटेल<br>४) मोहमद इस्माईल मोहमद इब्राहिम पटेल<br>५) मोहमद अनवर मोहमद इब्राहिम पटेल (मानसिक रुग्न) तर्फे पालन कर्ता मुलगा उसामा अनवर पटेल<br>६) सफिबाई अब्दुल गफुर खान<br>**७) कै. मुस्ताक अहमेद मोहमद इब्राहिम पटेल (मयत) यांचे वारस**<br>७.१) करीमा मुश्ताक अहमद पटेल<br>७.२) नुर अहमद मुश्ताक अहमद पटेल<br>७.३) मोहमद जुबेर मुश्ताक अहमद पटेल<br>७.४) यासीन मुश्ताक अहमद पटेल<br>७.५) इलीयास मुश्ताक अहमद पटेल<br>७.६) सामिना जाहुर पटेल<br>**८) कै. बशीर अहमद मोहमद इब्राहिम पटेल (मयत) यांचे वारस**<br>८.१) श्रीमती रुकसाना बशीर अहमद पटेल<br>८.२) श्री. लुकमान बशीर अहमद पटेल<br>८.३) श्री. उमेर बशीर अहमद पटेल<br>**९) कै. खादीजा अब्दुल रशिद खान (मयत) यांचे वारस**<br>९.१) श्री. बिलाल अब्दुल रशिद खानबुबेरे<br>हे एकपक्षी असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल–२, दस्त क्र. ३६८३/२०२२, दि. १०.०३.२०२२ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे **१) श्री. सुफियान बशीर अहमद पटेल** यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकार**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/४८७/२०२१–२२

# गुजरातची लखनऊवर मात

**मुंबई : प्रतिनिधी**

गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स या दोन नव्या संघांमध्ये सोमवारी (दि. २८) आयपीएलचा चौथा सामना चांगलाच रंगला. या अटीतटीच्या लढतीत गुजरातने लखनऊवर पाच गडी राखून विजय मिळविला. गुजरातच्या राहुल तेवतीयाने २४ चेंडूंत नाबाद ४० धावांची खेळी करून आपल्या संघाला जिंकवून दिले.



लखनऊने दिलेल्या १५९ धावांचे लक्ष गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या गुजरातच्या शुभमन गिलने घोर निराशा केली. तो पहिल्याच षटकात शून्यावर बाद झाला. त्यानंतर संघ १३ धावांवर असताना विजय शंकरच्या रूपाने गुजरातला दुसरा धक्का बसला. मग हार्दिक पांड्या आणि मॅथ्यू वेडने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र पांड्या ३३ धावांवर बाद झाला. त्यानंतर राहुल तेवतीयाने बहारदार खेळ करीत विजय खेचून आणला. डेव्हिड मिलर आणि राहुल या जोडीने अर्धशतकी भागिदारी केली. चौकार तसेच षटकार लगावत राहुल तेवतीयाने लखनऊच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले आणि नाबाद राहत पाच गडी राखून संघाला विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी गुजरातने नाणेफेक जिंकत क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. लखनऊ संघाकडून केएल राहुल आणि क्विंटन डी कॉक सलामीला मैदानात उतरले, मात्र पहिल्याच चेंडूमध्ये लखनऊचा कर्णधार झेलबाद झाला. त्यानंतर दुसऱ्याच षटकात मोहम्मद शमीने क्विंटन डी कॉकचाही बळी घेतला. त्यानंतर मैदानात उतरलेला एविन लुईसही चांगला खेळ करू शकला नाही. तो अवघ्या १० धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर लगेच मनीष पांडे शमीने टाकलेल्या चेंडूवर सहा धावांवर त्रिफळाचीत झाला. त्यामुळे लखनऊची चार गडी बाद २९ धावा अशी दयनीय स्थिती झाली होती.

मग दीपक हुडा आणि आयुष बदोनी यांनी चांगला खेळ केला. दीपकने ४१ चेंडूंमध्ये सहा चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ५५ धावा केल्या. दुसरीकडे २२ वर्षीय बदोनीने धमाकेदार फलंदाजी केली. त्याने ४१ चेंडूंमध्ये तीन षटकार आणि चार चौकार यांच्या मदतीने ५४ धावा केल्या. पुढे सातव्या विकेटसाठी कृणाल पांड्याने चांगली फलंदाजी करीत १३ चेंडूंमध्ये २१ धावा केल्या. हुडा, बदोनी आणि पांड्या यांच्या जोरावर लखनऊने गुजरातसमोर १५९ धावांचे आव्हान उभे केले होते. शमीने तीन, अरॉनने दोन, तर रशीद खानने एक बळी घेतला.

## लखनऊ संघ हरला, पण सगळीकडे चर्चा आयुषची

**मुंबई : प्रतिनिधी**

गुजरात टायटन्सविरुद्धचा सामना लखनऊ सुपर जायंट्सने गमावला असला तरी या संघातील २२ वर्षीय आयुष बदोनीची सगळीकडे चर्चा होत आहे. पदार्पणातच अर्धशतक ठोकत त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

आयपीएलच्या पंधराव्या हंगामामध्ये लखनऊ आणि गुजरात यांच्यात सामना झाला. या सामन्यात लखनऊचा पराभव झाला. सुरुवातीला पडझड झाल्यानंतर कर्णधार राहुलने अनुभवी कृणाल पांड्याला मागे ठेवून आयुष बदोनीला फलंदाजीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला. मैदानावर उतरल्यानंतर सेट होण्यासाठी आयुषने थोडा वेळ घेतला. नंतर मात्र बदोनीने फटकेबाजी केली. त्याने तीन षटकार आणि चार चौकार लगावत ४१ चेंडूंमध्ये ५४ धावा केल्या. त्याच्या या दमदार कामगिरीमुळेच लखनऊ १८५ धावसंख्येपर्यंत पोहचू शकला.



आयुषला लखनऊ संघाने बेस प्राईज म्हणजेच २० लाख रुपयांना विकत घेतले आहे. आयुषने २०१८मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात २८ चेंडूंमध्ये ५२ धावा केल्या होत्या. त्यानंतर त्याचे नाव चर्चेत आले. त्यानंतर आता लखनऊ संघाकडून त्याने आयपीएलमध्ये पदार्पण केले असून पदार्पणातच अर्धशतक ठोकले.

## कृणालने मारली दीपकला मिठी अन् सोशल मीडियावर मीम्सचा पूर



**मुंबई : प्रतिनिधी**

दीपक हुडा, आयुष बदोनी यांची फटकेबाजी राहिली बाजूला लखनऊ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स यांच्या लढतीत वेगळ्याच फोटोची चर्चा रंगली. कृणाल पांड्याने या सामन्यात दीपक हुडाला मालेली मिठी चर्चेत आली. दीपक फलंदाजी करीत असताना डग आऊटमध्ये बसून कृणाल त्याच्यासाठी टाळ्या वाजवताना दिसला. बाद होऊन दीपक पॅव्हेलियनमध्ये जात असताना कृणालने त्याची पाठ थोपटली अन् नंतर झेल घेतल्यावर त्याला मिठी मारली. सहकारी असे वागले तर त्यात नवल काही नाही, परंतु हे दोघे असे वागताना पाहून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.

आयपीएल ऑक्शनमध्ये लखनऊ सुपर जायंट्सने ८.२५ कोटींत कृणालला आपल्या ताफ्यात घेतले. त्यानंतर दीपक हुडासाठी त्यांनी ५.७५ कोटी मोजले. एकेकाळचे हे कट्टर वैरी एकाच संघातून खेळणार असल्याने सोशल मीडियावर तुफान चर्चा रंगली होती. प्रत्यक्ष त्यांना खेळताना पाहिल्यानंतर हे दोघे कसे जमवून घेतील याची उत्सुकता साऱ्यांना होती.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी ट्वेन्टी-२० स्पर्धेत बडोदा संघ वादामुळे चर्चेत आला होता. संघातील टॉप खेळाडू दीपक हुडाने या स्पर्धेतून माघार घेतली. त्याने कर्णधार कृणाल पांड्यावर सहकाऱ्यांसमोर शिवीगाळ केल्याचा आरोप केला होता. याबाबत उपकर्णधार हुडाने बडोदा क्रिकेट असोसिएशनकडे लेखी तक्रारही केली होती. वडोदरा येथील रिलायन्स स्टेडियमवर सराव करताना दीपक आणि कृणाल यांच्यात वाद झाला होता.

## कृणालने काढली हार्दिकची विकेट

**मुंबई** : इंडियन प्रीमियर लीगच्या चौथ्या सामन्यात गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स आमनेसामने होते. याशिवाय पांड्या ब्रदर्सही या सामन्यात एकमेकांशी भिडले. यात गुजरात टायटन्सने बाजी मारली, पण पांड्या ब्रदर्समध्ये कृणाल पुढे दिसला.

धाकटा भाऊ आणि गुजरातचा कर्णधार हार्दिक पांड्याची विकेट मोठा भाऊ कृणाल पांड्याच्या नावावर झाली. हार्दिकने या सामन्यात २८ चेंडूंत ३३ धावा केल्या. या खेळीदरम्यान तो पूर्ण जबाबदारीने फलंदाजी करताना दिसला आणि त्याने पाच चौकार आणि एक षटकार लगावला. कृणालने हार्दिकची विकेट घेताच सोशल मीडियावर मीम्सचा महापूर आला.

गोलंदाजीत क्रुणालने हार्दिकची विकेट घेत लखनऊचे पुनरागमन केले, पण अखेरच्या षटकात गुजरातच्या धावा रोखण्यात संघाला अपयश आले. दरम्यान, लखनऊ ३१ मार्च रोजी चेन्नईविरुद्ध पुढील सामना खेळेल, तर गुजरात २ एप्रिल रोजी दिल्लीविरुद्ध पुढील सामना खेळेल.

मियामी खुली टेनिस स्पर्धा

## बोपण्णा-शापोव्हालोव्ह जोडी उपांत्यपूर्व फेरीत

**मियामी : वृत्तसंस्था**

भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा कॅनडाचा साथीदार डेनिस शापोव्हालोव्हने मियामी खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.



बोपण्णा-शापोव्हालोव्ह जोडीने पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीतील सामन्यात क्रोएशियाच्या निकोला मेकटिच आणि मेट पाव्हिच या अग्रमानांकित जोडीला ६-३, ७-६ (३) असा पराभवाचा धक्का दिला. आता त्यांच्यापुढे सहाव्या मानांकित वेस्ली कूलहॉफ आणि नील स्कुप्स्की जोडीचे आव्हान असेल.

## महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची तारीख ठरली

**सातार्‍यात ५ ते ९ एप्रिलदरम्यान थरार**

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदा ६४वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा ५ ते ९ एप्रिलदरम्यान रंगणार आहे. या स्पर्धेचे वेळापत्रक व नियमावलीही कुस्तीगीर परिषदेने जाहीर केली आहे. त्यामुळे मल्लांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून कुस्तीचा आखाडा थंड पडला होते. आता पुन्हा आखाडे गजबलेले पहायला मिळणार आहेत.

गेल्या दोन वर्षांत अनेकदा होणाऱ्या लॉकडाऊनमुळे अनेक जत्रा, यात्रा, उरूस रद्द झाले. त्यामुळे कुस्तीप्रेमींच्या आनंदावरही विरजण पडले. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने पुन्हा दंड




कडाडणार आहेत, पुन्हा आखाडे गाजणार आहेत. यंदाची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा सातार्‍यात होणार आहे.

महाराष्ट्राला आणि देशाला कुस्तीची मोठी परंपरा आहे. आपल्या देशातील अनेक मल्ल जागतिक स्तरावर चमकले आहेत. कुस्तीने भारताला ऑलिम्पिकमध्येही अनेक पदके जिंकून दिली आहेत. महाराष्ट्र केसरी ही राज्यातील मानाची कुस्ती स्पर्धा आहे. या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी मल्ल वर्षभर तयारी करीत असतात. देशभरातून पैलवान या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत सहभागी होतात. त्यामुळे मैदानातील थरार बघण्यासारखा असतो. आता पुन्हा हा थरार पहायला मिळणार आहे.

## विविध स्पर्धांमध्ये नीरज करणार भारताचे प्रतिनिधित्व

**लखनऊ : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशमधील मेरठचा युवा तिरंदाज नीरज चौहानचे कुटुंब कोरोना काळात रस्त्यावर आले, मात्र त्या परिस्थितीवर मात करीत नीरजने आपले कुटुंब तर सांभाळलेच, सोबतच त्याने आपल्या ध्येयाच्या दिशेने सुरू असलेला प्रवास न थांबवता आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीची पात्रता फेरी पूर्ण केली. नीरज आता आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करताना दिसणार आहे. नीरजची आशियाई स्पर्धा, तिरंदाजी विश्वचषक आणि जागतिक खेळांमध्ये निवड झाली आहे.

हरियाणाच्या सोनीपत येथे २४ ते ३० मार्चदरम्यान सुरू असलेल्या तिरंदाजीच्या चाचणीत नीरज पात्र ठरला. चाचण्यांमध्ये दुसरे स्थान पटकावून नीरजने आशियाई क्रीडा स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे.

मूळचे गोरखपूरचे असलेले नीरज चौहानचे वडील अक्षयलाल हे मेरठमधील कैलाश प्रकाश स्टेडियममध्ये स्वयंपाकी आहेत. या स्टेडियममध्ये नीरजने तिरंदाजीचा सराव सुरू ठेवला, पण कोरोनाच्या काळात वडिलांची नोकरी गेली आणि जगणे कठीण झाले. अशा परिस्थितीतही नीरज मागे हटला नाही. त्याने कोरोना काळात मिळेल ती कामे करून कुटुंबाच्या पालनपोषणासाठी वडील आणि भावासोबत मेहनत केली. या काळात त्याने त्याच्या तिरंदाजीवरील लक्ष विचलित होऊ दिले नाही.



आशियाई क्रीडा स्पर्धा यंदा नोव्हेंबरमध्ये जाकार्ता येथे होणार आहेत. नीरज त्यात सहभागी होणार आहे. त्याचवेळी एप्रिलमध्ये तुर्कीतील अँटालिया येथे विश्वचषक आणि जागतिक क्रीडा स्पर्धा यूएसए येथे होणार आहे. या तिन्ही स्पर्धांमध्ये नीरज भारताचे तिरंदाजीत प्रतिनिधीत्व करणार आहे.

### कोरोना काळात उपसले कष्ट

नीरजचा मोठा भाऊ सुनील चौहान बॉक्सर आहे. दोन्ही भावांनी मिळून कोरोनाच्या काळात भाजीपाल्याची गाडी लावून कुटुंब चालवले. त्यांचा एक व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यानंतर तत्कालीन केंद्रीय क्रीडामंत्री किरेन रिजिजू यांनी दोन्ही खेळाडूंना आर्थिक मदत केली होती. पुढे नीरजची स्पोर्ट्स कोट्यातून आयटीबीपीमध्ये निवड झाली. आता पुन्हा एकदा मुलगा स्पर्धेत खेळणार हा नीरज व त्याच्या कुटुंबासाठी खूप आनंदाचा क्षण आहे.



पनवेल : ग्रुप ग्रामपंचायत वाजे आयोजित सरपंच-उपसरपंच चषक क्रिकेट स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.





पनवेल : भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर यांच्या वाढदिवसानिमित्त पडघे येथील जि. प. शाळेत मोफत ई-श्रम कार्ड महानोंदणी अभियान आयोजित करण्यात आले होते. भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्या ठिकाणी भेट देऊन दिनेश खानावकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, तर आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी माजी सरपंच कृष्णाशेठ पाटील, दिलीप भोईर, आशिष कडू, पवन भोईर, रूपेश कांबळे, गुरूनाथ भोईर, आनंद कांबळे, डॉ. संतोष आगलावे आदी उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com